MHSO100019522022

## <u>वि.दि.दा.क्र.३७७/२०२२ मधील नि.क्र.३१ खालील आदेश</u>.

वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिताचे, क्रम–६, नियम १७ व क्रम–२२, नियम–४ प्रमाणे मयत प्रतिवादी–महादेव एकनाथ गायकवाड याचे नावास कंस करुन त्याचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे. त्याने सदरच्या अर्जात कथन केले आहे की, प्रतिवादी हा ता.१३.०९.२०२३ रोजी मयत झाला आहे. प्रतिवादीला श्रीमती निलावती महादेव गायकवाड, ७५ वर्षे व रमेश महादेव गायकवाड, वय–४८ वर्षे, दोघांचा धंदा–शेती, दोघे रा.माळीनगर, श्रीहरीनगर, ता.माळशिरस, जि.सोलापूर असे वारस आहेत.

२. दाव्यातील सरनाम्यात प्रतिवादी याच्या नावास कंस करुन त्यापुढे मयत वारस असे लिहिण्यास व प्रतिवादी क्र.१अ) व १ब) अशी वर नमुद केल्याप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी मागितली आहे. वादीला मयत प्रतिवादीचे वारसांविरुध्द सदरच्या दाव्याचे कामकाज पुढे चालविण्याचा अधिकार आहे. सदरच्या दुरुस्तीमुळे मुळ दाव्याच्या विषयात किंवा स्वरुपात कोणताही बदल होत नाही. तसेच सदरच्या दुरुस्त्यामुळे प्रतिवादीचे काहीही नुकसान होणार नाही. म्हणून त्याने त्याचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. सदरचे अर्जास प्रतिवादीने जबाब न दिल्यामुळे त्याच्या जबाबाशिवाय सदरच्या अर्जाचे कामकाज चालविण्यात येत आहे.

४. वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्दयावर मी माझे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे काय? | ... | होय. |
| २. | आदेश काय? | ... | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र.१ बाबतः–

५. मी वादीतर्फे विद्वान वकील श्री.देव यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच सदरच्या प्रकरणांमधील संबंधीत दस्तऐवज पाहिले. प्रतिवादी हा ता.१३.०९.२०२३ रोजी मयत झाल्याचे दिसुन येते. प्रतिवादीचे वारस सदरच्या दाव्यात आवश्यक पक्षकार आहेत. मयत प्रतिवादीला वारस वर नमुद केल्याप्रमाणे असल्याचे दिसुन येते. वादीला मयत प्रतिवादीच्या वारसांविरुध्द सदरचा दावा चालविण्याचा अधिकार आहे. सदरच्या नियोजीत दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरुपात बदल होत नाही. तसेच सदरच्या नियोजीत दुरुस्तीमुळे प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होत नाही. त्यामुळे मयत प्रतिवादीच्या सर्व वारसांची नावे दाव्यात समाविष्ट करण्यास व त्याबाबत दुरुस्ती करण्यास परवानगी देणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर ''होकारार्थी'' नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ बाबतः–**

६. मी वर नमुद केल्याप्रमाणे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र.२ चे उत्तरासाठी खालील अंतिम आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

सदरचा नि.क्र.३१ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by GHANWAT SOPAN DASHRATH
Date: 2026.04.28 15:44:33 +0530

दि.२८.०४.२०२६. (सोपान द.घनवट)
दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर,
माळशिरस.

**वि.दि.दा.क्र.३७७/२०२२**
**मधील नि.क्र.३१ खालील आदेश.**

शेरा

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नावःश्री. म. पां. सदाफुले.

न्यायालयाचे नावःदि. न्या. व. स्तर, माळशिरस.

आदेशाचा मजकूर सांगितल्याचा दि.२८.०४.२०२६.

आदेश टंकलिखित केलेला दि.२८.०४.२०२६.

आदेश स्वाक्षरित केल्याचा दि.२८.०४.२०२६.

आदेश अपलोड केल्याचा दि.२८.०४.२०२६.

स्वाक्षरित/–
(श्री. म. पां. सदाफुले )
लघुलेखक ग्रेड – २,
दिवाणी न्यायालय, व. स्तर, माळशिरस.